महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

नोव्हेंबर २०२५

# ई वार्ता




N

**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ❁ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२८२५/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

नोव्हेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, नोव्हेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे नैसर्गिक शेती परिषद संपन्न






**दि. १८ नोव्हेंबर, २०२५.** राजभवनाअंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक शेती परिषद संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर कृषि मंत्री मा.ना. दत्तात्रय भरणे व कृषिचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी उपस्थित होते. याप्रसंगी राजभवनाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठ तथा अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय भावे, नागपूर येथील माफसूचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, आनंद कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथारिया, दांतिवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राघवेंद्रसिंह चौहान, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, कृषि आयुक्त सूरज मांढरे,गुजरात प्राकृतिक विकास बोर्डाचे कार्यकारी संचालक सी. एम. पटेल, गुजरात राज्याचे आत्मा प्रकल्प प्रमुख एस. के. जोशी, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने उपस्थित होते. याप्रसंगी राज्यपाल आचार्य देवव्रत मार्गदर्शन करताना म्हणाले की हरित क्रांतीच्या आधी आपल्या देशातील जमिनीचा सेंद्रिय कर्ब २ च्या वर होता आता तो ०.५ च्या खाली झाला आहे. याचे कारण म्हणजे रासायनिक खते, कीटकनाशके आणि तन नाशकांचा वापर. यामुळे शेती खर्चिक झाली असून जमीन हळूहळू नापीक होत आहे. रासायनिक औषधे वापरून उत्पादित फळे,भाज्या व धान्यांमुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, कॅन्सर सारखे आजार मोठ्या प्रमाणावर दिसत आहे. रासायनिक शेतीमुळे जमीन नापीक होत आहे व माणसांचे आरोग्य ढासळत आहे. नैसर्गिक शेतीमुळे जमीन उत्पादक होत असून, सकस उत्पादन मिळून पुढची पिढी सुदृढ होणार आहे. नैसर्गिक शेतीमध्ये शेतकऱ्याला बाजारपेठेतून काहीच आणावे लागत नाही. कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी ही नैसर्गिक शेती आहे. यासाठी फक्त शेतकऱ्याकडे देशी गाय असणे आवश्यक आहे. नैसर्गिक शेतीमुळे शेतकरी कर्जमुक्त होईल. यासाठी सर्व कृषि विद्यापीठांवर जबाबदारी आहे की त्यांनी पारंपारिक बियाणे संवर्धन करावे व त्यांची उत्पादकता वाढविण्याचा उपक्रम घ्यावा. पशुविज्ञान विद्यापीठांनी देशी गाईंचे संवर्धनाचा व वंशवृद्धीचा उपक्रम हाती घ्यावा. नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय शेती या दोन वेगळ्या संकल्पना आहेत हे प्रथम सर्वांनी जाणून घ्यावेत. जंगलात हजारो वनस्पती वाढतात व नैसर्गिक आपत्तीमध्ये सुद्धा तग धरतात. जंगलातला जो नियम आहे तोच नियम आपल्याला शेतात राबवायचा आहे. जंगलामध्ये सेंद्रिय कर्ब फार मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे जंगलातील जमिनीत सूक्ष्म जिवाणू मोठ्या प्रमाणात सापडतात. नैसर्गिक शेतीचा पाया हा सेंद्रिय कर्बापासून सुरू होतो. जेवढ्या जास्त प्रमाणात सेंद्रिय कर्ब तेवढ्या जास्त प्रमाणात मातीत सूक्ष्म जिवाणू आणि जेवढ्या जास्त प्रमाणात सूक्ष्म जिवाणू तेवढ्या जास्त प्रमाणात पिकांना अन्नद्रव्य उपलब्ध होणार. संयुक्त राष्ट्र संघाच्या रिपोर्ट प्रमाणे भारतामध्ये युरिया, डीएपी सारख्या रासायनिक खतांचा असाच वापर होत राहिला तर पुढील ५० वर्षात जमिनीतील सर्व सेंद्रिय कर्ब नाहीसे होऊन जमीन ही फरशीसारखी कडक होणार आहे. गुजरातच्या आरोग्य विभागाचा अहवालाप्रमाणे सन २०२० पर्यंत गुजरातमध्ये ७० हजार कॅन्सरचे पेशंट होते आता त्यांची संख्या २ लाख ४० हजार झाली आहे. आता प्रति दिवस ७९० कॅन्सर पेशंट समोर येत आहेत. हे सर्व बदलती जीवनशैलीत पाश्चात्य देशांचे अनुकरण, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा शेतीमध्ये वापर याचा परिणाम आहे. चाळीस वर्षांपूर्वीच्या लोकांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, कॅन्सर सारखे आजार दिसत नव्हते, कोणाचेही गुडघे बदलावे लागत नव्हते. आता लहान मुलांना हृदयविकाराचे झटके येत आहेत, आईच्या दुधात हानिकारक पदार्थ सापडत आहेत. हे सगळे रासायनिक शेतीचे दुष्परिणाम आहे. नैसर्गिक शेती केली तर जमीन उत्पादक होईल, जमिनीमधील सूक्ष्म जिवाणू वाढतील, गांडुळांची संख्या वाढेल, पूर परिस्थिती राहणार नाही,

पुढची पिढी सुदृढ होईल आणि पारंपारिक बियाण्यांचे व देशी गाईंचे संवर्धन होईल. नैसर्गिक शेती ही पुढील पिढी सुदृढ बनवेल जे विकसित भारता साठी कार्य करेल व देश श्रीमंत होऊन महाशक्ती बनेल.

यावेळी कृषिमंत्री श्री. दत्तात्रय भरणे मार्गदर्शन करताना म्हणाले माननीय राज्यपालांनी हरियाणामध्ये २०० एकरावर गुरुकुल उभे केले आहे. यात त्यांनी नैसर्गिक शेतीचे यशस्वी प्रयोग केलेले आहेत. नैसर्गिक शेतीचे महत्व पटवून देणारे आपल्याला राज्यपाल लाभले आहे त्यांच्या ज्ञानाचा सर्वांनी फायदा घ्यावा. रासायनिक खते, कीटकनाशके व तननाशके यांचा शेतीमधील अतीवापरामुळे जमिनीची प्रत घालवत आहे व हळूहळू जमीन नापिक होत आहे. जमिनीची प्रत उंचविण्यासाठी आणि सकस आहाराची निर्मिती करण्यासाठी नैसर्गिक शेतीची गरज आहे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राजभवनाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले. याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या तांत्रिक सत्रामध्ये आनंद कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथारिया, दांतिवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राघवेंद्रसिंह चौहान, गुजरात प्राकृतिक विकास बोर्डाचे कार्यकारी संचालक सी. एम. पटेल, गुजरात राज्याचे आत्मा प्रकल्प प्रमुख एस. के. जोशी यांनी गुजरात राज्यात नैसर्गिक शेती संदर्भात केलेले संशोधनाचे सादरीकरण केले. या नैसर्गिक शेती कार्यशाळेसाठी राज्यातील चारही कृषि विद्यापीठांचे व माफसूचे सर्व संचालक, कृषि विभागाचे सर्व संचालक, आत्मा संचालक, आटारी संचालक, विभागीय कृषि सहसंचालक, उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञ, राज्यातील सर्व कृषि विज्ञान केंद्रांचे प्रकल्प समन्वयक उपस्थित होते. या परिषदेच्या आयोजनासाठी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार कृषि विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी यांनी आणि सूत्रसंचालन पल्लवी सूर्यवंशी यांनी केले.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील शाश्वत देशी गोपालन मॉडेलची कृषि व पशुसंवर्धन सचिव व इतर मान्यवरांकडून पाहणी





**दि. १८ नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजित नैसर्गिक शेती कार्यशाळेनिमित्त विविध मान्यवर अधिकारी व शास्त्रज्ञांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन प्रकल्पाचा सखोल आढावा घेतला. या भेटीप्रसंगी कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव श्री. विकास चंद्र रस्तोगी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, पोकराचे संचालक श्री. परिमल सिंग, कुलगुरू डॉ. शरद गडाख, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, गुजरात येथील आनंद कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथेरिया, गुजरात येथील सरदार कृषिनगर दंतीवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्रसिंग चव्हाण, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुखणे या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून प्रकल्पाच्या कार्यप्रणालीचे कौतुक केले. या भेटीदरम्यान मान्यवरांनी केंद्रातील प्रगत कार्यपद्धती, संशोधन उपक्रम आणि शाश्वत देशी गोपालनासाठी राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची माहिती घेतली. प्रकल्पात विकसित केलेल्या भारतातील आदर्श व शाश्वत देशी गोपालन मॉडेलची पाहणी करताना त्यांनी केंद्राच्या सर्वांगीण कामाचे कौतुक केले. प्रकल्पामध्ये असणाऱ्या भारतातील सर्वाधिक दूध देणाऱ्या सहिवाल, गीर, थारपारकर, राठी, रेड सिंधी या देशी गाईंच्या जातींची तसेच महाराष्ट्रातील स्थानिक सहा जाती यासोबतच भारतातील सर्वात लहान देशी गाय पुंगरुर याविषयीची माहिती

त्यांनी उत्सुकतेने जाणून घेतली. भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाद्वारे तयार झालेला उच्च प्रतीचा गोवंश तसेच गो परिक्रमा, नैसर्गिक शेतीपूरक विविध पद्धती, पशुपालन व्यवस्थापन मॉडेल आणि प्रकल्पाने विकसित केलेल्या आधुनिक मोबाईल एप्लीकेशनची पाहणी करताना या प्रकल्पाने तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत कृषि गोपालन क्षेत्रात उभारलेला मार्गदर्शक पायंडा सर्वांनी विशेष कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने यांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती संबंधितांना दिली.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात बीजोत्पादनाचा खरीप आढावा व रब्बी हंगाम नियोजन बैठक संपन्न



**दि. २५ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये बीजोत्पादनाचा खरीप आढावा व रब्बी हंगाम नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू ऑनालाईन डॉ. शरद गडाख उपस्थित होते. होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार व वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. शरद म्हणाले की खरीप हंगामातील अपेक्षित असलेला बीजोत्पादनाचा लक्षांक अति पावसामुळे बीजोत्पादन प्लॉटचे नुकसान होऊन देखील पूर्ण करता आला. तसेच रब्बी हंगामासाठी अपेक्षित असलेला बीजोत्पादनाचा लक्षांक गाठता येईल अशी अपेक्षा आहे. विद्यापीठाचा बीजोत्पादन कार्यक्रम फार महत्त्वाचा आहे. विद्यापीठाच्या आत्मनिर्भर होण्यामध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी घेत असलेल्या बीजोत्पादनाची मोठी मदत होईल. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये विद्यापीठात होत असलेल्या रब्बी हंगामातील बीजोत्पादनाबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. नितीन दानवले यांनी बीजोत्पादनाचा खरीप हंगामाचा आढावा व रब्बी हंगामाचे नियोजन याचा आढावा सादर केला. सादरीकरणात ते म्हणाले की खरीप बीजोत्पादनासाठी ४६५ हेक्टर क्षेत्रावरील ६६०० क्विंटल लक्षांक ठेवला होता. परंतु सरासरीपेक्षा दुप्पट झालेल्या पावसामुळे बीजोत्पादनामध्ये सुमारे ३५ टक्के घट येऊन विविध पिकांचे सुमारे ४२५० क्विंटल बीजोत्पादन झाले. यामध्ये केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय तसेच विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांनी ९२१ क्विंटल बिजोत्पादनाचा लक्षांक दिला होता. विद्यापीठाला प्रतिकूल परिस्थितीमध्ये ४२५० क्विंटल एवढे विविध पिकांचे बीजोत्पादन मिळाले आहे. रब्बी बीजोत्पादनामध्ये केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय व विविध शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी रब्बी हंगामातील विविध पिकांचा ८६४ क्विंटल मूलभूत बियाण्याचा लक्षांक दिला असून विद्यापीठाने ३१९ हेक्टर क्षेत्रावर ३८२० क्विंटल बीजोत्पादनाचे नियोजन केले असल्याचे माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांनी भाजीपाला पिकांचा खरीप हंगामासाठीचे बीजोत्पादन तसेच रब्बी हंगामाचे नियोजन याविषयीचा आढावा सादर केला. डॉ. राजेंद्र भिलारे यांनी ऊस या पिकाचे खरीप व रब्बीचे नियोजन यासंबंधीच्या बेणे उत्पादनाचा आढावा सादर केला. डॉ. सचिन मगर यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध रोपवाटिकांमध्ये तयार केलेल्या विविध फळझाडांचे कलमे, रोपे यांचा आढावा सादर केला. डॉ. योगेश सैंदाणे यांनी जैविक औषधे व जैविक बुरशीनाशके यांच्या विषयीचा आढावा सादर केला. डॉ. सुदर्शन लटके यांनी विविध जैविक खते यांचा तर डॉ. ताटपुरकर मॅडम यांनी फुले मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड टू उत्पादनाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार डॉ. दिलीप गायकवाड यांनी मानले. या बैठकीसाठी संशोधन उपसंचालक डॉ. बाळासाहेब पाटील, मध्यवर्ती परिसरातील विविध प्रकल्पाचे प्रमुख प्रत्यक्ष तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील योजनाप्रमुख व विविध पीक विशेषज्ञ ऑनलाईन उपस्थित होते. बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी बियाणे विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला ओरिसा कृषि आणि वैशियीकी विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. प्रभात कुमार राऊल यांची भेट





**दि. ९ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विविध प्रकल्पांना भेटी दिल्यानंतर फुले कृषि वाहिनी ९०.८ एफएमला भुवनेश्वर येथील ओरिसा कृषि आणि वैशियीकी विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. प्रभात कुमार राऊल भेट दिली. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी तसेच वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल, उद्यानविद्या विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर, फुले कृषि वाहिनीचे प्रमुख डॉ. आनंद चवई व संशोधन संचालनालयाचे डॉ. संजय तोडमल उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. प्रभात कुमार राऊल मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांमध्ये नवनवीन वाणांची निर्मिती तसेच प्रयोगशाळेमध्ये उत्कृष्ट तंत्रज्ञानाची निर्मिती केली आहे. विद्यापीठाच्या या तंत्रज्ञानाचा प्रसार विद्यापीठाने २०२३ मध्ये सुरू केलेल्या फुले कृषि वाहिनी ९०.८ एफएम या वाहिनीमार्फत परिसरातील हजारो शेतकऱ्यांपर्यंत होत आहे. शेतकरी व शेतीशी संबंधित काम करणाऱ्या विविध घटकांपर्यंत विद्यापीठाचे तंत्रज्ञान पोहोचण्यासाठी या फुले कृषि वाहिनीचा वापर निश्चितच कौतुकास्पद आहे.

कुलगुरू डॉ. प्रभात कुमार राऊल यांनी आज सकाळी दहा वाजल्यापासून विद्यापीठातील विविध प्रकल्पांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाबद्दल डॉ. विक्रम जांभळे यांनी, फळपिके प्रात्यक्षिके व भाजीपाला प्रकल्प, उद्यानविद्या रोपवाटिका, काढणी पश्चात तंत्रज्ञान याबद्दल डॉ. राजेंद्र क्षीरसागर, डॉ. अमोल क्षीरसागर व डॉ. शर्मिला शिंदे यांनी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र व फुले कृषि वाहिनी ९०.८ एफएम याबद्दल डॉ. आनंद चवई यांनी, काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाबद्दल डॉ. सुनील कदम व डॉ. पवन कुलवाल यांनी तर फुले सुपर बायोमिक्स निर्मिती प्रकल्पाबद्दल डॉ. आर. टी. गायकवाड यांनी, अवजारे प्रकल्पाबद्दल डॉ. रविकिरण राठोड यांनी, बेकरी युनिटबद्दल डॉ. बाबासाहेब भिटे यांनी, कीडनाशक अवशेष पृथक्करण प्रयोगशाळेबद्दल डॉ. योगेश सैंदाणे व डॉ. भाईदास देवरे यांनी माहिती दिली.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. २० नोव्हेंबर, २०२५.** कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विस्तार शिक्षण संचालनालयांतर्गत असलेले कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने खपली गहू लागवड तंत्रज्ञान या विषयावर कोंढवड येथील खपली गहू शेतकरी शास्त्रज्ञ–मंचाच्या सदस्यांसाठी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरेश दोडके, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, तालुका कृषि अधिकारी बापुसाहेब शिंदे, कोंढवडचे सरपंच तथा भारत कृषक समाजाचे तालुका अध्यक्ष अर्जुन म्हसे व शिलेगावचे सरपंच पांडुरंग म्हसे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की कोंढवड व शिलेगाव येथील खपली गहू शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या शेतकऱ्यांनी गटाद्वारे केलेला ६०० एकराच्यावर खपली गहू लागवडीचा उपक्रम हा स्तुत्य आहे. या शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आपण



आजचा हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. खपली गव्हामध्ये कोंढवडचे नाव राज्यात घेतले जात आहे. येथील खपली गव्हाच्या जी.आय. मानांकनासाठी कृषि विभागामार्फत प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांनी असे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले तर विद्यापीठ सदैव त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सज्य राहील. शेतकऱ्यांनी नुसते खपली गव्हाचे उत्पादन न घेता त्याचे मुल्यवर्धन करावे व अधिकचा फायदा घ्यावा. यावेळी डॉ. प्रशांत बोडके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सुरेश दोडके यांनी खपली गहू लागवड तंत्रज्ञान, श्री. बापुसाहेब शिंदे यांनी शासनाच्या विविध कृषि योजना व महाविस्तार ए.आय. ॲप, डॉ. विवेक शिंदे यांनी खपली गहू रोग व्यवस्थापन, डॉ. धनश्री सरनोबत यांनी फुले सुपर बायोमिक्सचा वापर, डॉ. शितल ताटपुरकर यांनी फुले सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-२ चा वापर, डॉ. बाबासाहेब भिटे यांनी खपली गहू काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि डॉ. योगेश बन यांनी भरडधान्याची लागवड व त्याचे आहारातील महत्व या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. आनंद चवई यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठाचे माजी शास्त्रज्ञ डॉ. श्रीकांत कुलकर्णी, अर्जुन म्हसे, पांडुरंग म्हसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे डॉ. सुनिल अडांगळे यांनी तर आभार डॉ. अन्सारखान अत्तार यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा





**दि. २६ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, एनसीसी अधिकारी लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे, प्रभारी कुलसचिव श्री. व्ही.टी. पाटील व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयापासून मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत भारतीय राज्यघटनेच्या संविधान प्रतीची मिरवणूक काढण्यात आली. या संविधान रॅलीमध्ये पदव्युतर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
नोव्हेंबर २०२५

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व ३०० पेक्षा जास्त संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, कर्मचारी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

या रॅलीमध्ये संविधान दिनाच्या निमित्ताने संविधानाबद्दलच्या घोषणेतून संविधानाचे महत्त्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला. यानंतर मुख्य प्रशासकीय इमारती समोर झालेल्या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करताना म्हणाले की भारताचे संविधान हे खूप संशोधनाअंती तयार झाले आहे. त्यामध्ये संपूर्ण भारतीयांचे जीवनमान नियमितपणे चालण्यासाठी हक्क व अधिकार यांचा समावेश करण्यात आला आहे. मी आपणाला आवाहन करतो की सर्वांनी आपल्या जीवनात काही अंशीका होईना कायद्याचा अभ्यास करावा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान समजून घ्यावे. डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की भारतीय संविधान हे देशातील तमाम जनतेसाठी तयार करण्यात आले असून ते जगात सर्वश्रेष्ठ असल्याचे सर्वांनी मानले आहे. आपला देश विविध जाती, धर्म व पंथांनी तयार झालेला आहे. विविध भाषांचे प्रांत तयार झालेले असले तरीही एक राष्ट्र म्हणून भारत अखंड उभा आहे. आशिया खंडातील विविध देशांमध्ये चाललेली आंदोलने व अस्थिर झालेले वातावरण पाहता देशाचे संविधान किती महत्त्वाचे आहे हे समजते. सर्वांना या संविधान दिनानिमित्त आवाहन करतो की प्रत्येकाने आपल्या घरात संविधानाची एक प्रत जतन करावी. यावेळी डॉ. कैलास कांबळे यांनी संविधान दिनाची पार्श्वभूमी सांगून उपस्थितांना संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून शपथ दिली. आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन उत्साहात संपन्न





**दि. ७ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पदव्युत्तर महाविद्यालयाच्या प्रांगणात वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त वंदे मातरम या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे म्हणाले की इंग्रजांच्या राजवटीमध्ये देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पाहत प्रत्येक जण इंग्रज राजवटीविरुद्ध प्रखर लढा देत होता. अशा परिस्थितीमध्ये बकीमचंद्र चटर्जी यांनी अक्षय नवमीला दि. ७ नोव्हेंबर, १८७५ रोजी वंदे मातरम हे गीत लिहिले. स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातरम कोट्यावधी भारतीयांचा युद्धघोष बनले.अशाप्रकारे भारतीय जनतेला प्रेरणा देण्यातील त्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे. या गीताच्या लेखनाला दीडशे वर्ष पूर्ण झाली असून या गीतामध्ये त्यांनी मातृभूमीचे सुंदर वर्णन केले आहे. या गीतातूनच प्रत्येक देश वासियाला देशप्रेमाचे बळ मिळाले असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी डॉ. आनंद चवई यांनी केंद्र सरकारने दिलेल्या सूचनेनुसार चार टप्प्यात कार्यवाही करून हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगून या कार्यक्रमाच्या आयोजनासंबंधीची माहिती दिली. क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी यांनी आभार मानले. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, दोन्ही महाविद्यालयांचे सहाय्यक कुलसचिव, सुरक्षा अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी तसेच पदव्युत्तर व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

नोव्हेंबर २०२५

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या हस्तांतरण सोहळ्याचे प्रक्षेपण कृषि विद्यापीठात संपन्न



**दि. १९ नोव्हेंबर, २०२५.** तामिळनाडू येथील कोइंबतूर येथे सुरू असलेल्या साउथ इंडिया नॅचरल फार्मिंग समिट २०२५ या कार्यक्रमांमध्ये देशातील नऊ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना १८००० कोटी रुपयांचा पंतप्रधान किसान सन्माननिधी योजनेचा २१वा हप्ता पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी वितरित केला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपन विद्यापीठात शेतकरी व शास्त्रज्ञांसाठी करण्यात आले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले, कापूस सुधार प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पवन कुलवाल, डॉ. उल्हास सुर्वे व डॉ. भाईदास देवरे उपस्थित होते.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी भारत सरकार प्रयत्नशील असून पीएम किसानचा एकविसावा हप्ता आज मा.पंतप्रधानांच्या हस्ते शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला. यामध्ये जवळजवळ नऊ कोटी शेतकऱ्यांना १८००० कोटींपेक्षा जास्त रक्कम मिळाली आहे. यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा सन्मान झाला आहे. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के, डॉ. प्रशांत बोडके, डॉ. कैलास कांबळे, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. उल्हास सुर्वे व डॉ.भाईदास देवरे यांनी नैसर्गिक शेती पध्दती, पॉलीटनेल ड्रायर, फुले सुपर बायोमिक्स, सेंद्रिय शेतीतील एकात्मिक पीक व्यवस्थापन व कृषि उत्पादनातील कीटकनाशक अवशेष व्यवस्थापन या विषयांवर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. याप्रसंगी मंडल कृषि अधिकारी श्री. बाळासाहेब सोनवणे आणि सहाय्यक कृषि अधिकारी श्री. दुर्गेश पाटील यांनी महाविस्तार ए आय या ॲपबद्दल माहिती दिली. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सचिन सदाफळ व सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख यांच्या हस्ते प्रकल्पातील तांभेरे व कानडगावातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फुले सुपर बायोमिक्स व फुले मायक्रो न्यूट्रियंट ग्रेड टू चे वाटप करण्यात आले. यावेळी शास्त्रज्ञ, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न

**दि. १७ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागातील डॉ. बाबासाहेब भिटे, कृषि सहाय्यक श्री. राहुल घुगे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. विक्रम कड म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये आवळ्यापासून विविध पदार्थ निर्मिती करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना भविष्यात आपला उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना आवळा प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती ज्यामध्ये आवळा कॅन्डी, आवळा गर साठवणे, आवळा लोणचे, आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा मुरंबा, आवळा सिरप व आवळा पावडर तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.



त्याचबरोबर अन्न सुरक्षितता व मानके, कायद्याची माहिती प्रक्रिया, उद्योगाची नोंदणी, उद्योगासाठी लागणारी मशिनरी व त्यांची देखभाल, पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, प्रक्रिया उद्योगासाठी शासनाच्या कर्ज योजना, अनुदान यासंबंधीची माहिती दिली जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब भिटे यांनी तर सूत्रसंचालन श्री. राहुल घुगे यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. गोरक्षनाथ चौधरी यांनी केले. यावेळी या प्रशिक्षणासाठी मुंबई, पुणे, सातारा, अहिल्यानगर, जालना व नंदुरबार या जिल्ह्यातून आलेले १६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. २१ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत पाच दिवसीय आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, उद्यानविद्या विभागातील काढणी पश्चात तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र ढेमरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख व डॉ. बाबासाहेब भिटे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की आवळा हे फळ क जीवनसत्व मोठ्या प्रमाणात असलेले बहुउपयोगी फळ आहे. कोविड काळामध्ये विटामिन क च्या गोळ्यांचा वापर मोठ्या प्रमाणात झाला होता. अशाप्रकारे औषधी गुणधर्माने युक्त असलेल्या महत्त्वाच्या आवळा प्रक्रिया प्रशिक्षणामधून तुम्हाला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग तुम्ही आवळा प्रक्रिया उद्योग सुरू करू शकता. त्यायोगे एक चांगला स्वतःचा ब्रँड विकसित करा. या प्रक्रिया उद्योगातून तुम्ही समाजाच्या स्वास्थ्यासाठी खात्रीशीर पदार्थ निर्मिती करू शकता. यातून तुमच्या स्वयंरोजगारामुळे समाजातील इतरांनाही रोजगार उपलब्ध होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना आवळा प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती ज्यामध्ये आवळा कॅन्डी, आवळा गर साठवणे, आवळा लोणचे, आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा मुरंबा, आवळा सिरप व आणि आवळा पावडर तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याचबरोबर

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

नोव्हेंबर २०२५



अन्न सुरक्षितता व मानके, कायद्याची माहिती प्रक्रिया, उद्योगाची नोंदणी, उद्योगासाठी लागणारी मशिनरी व त्यांची देखभाल, पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, प्रक्रिया उद्योगासाठी शासनाच्या कर्ज योजना, अनुदान यासंबंधीची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राहुल घुगे यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी मुंबई, पुणे, सातारा, अहिल्यानगर, जालना व नंदुरबार या जिल्ह्यातून आलेले १६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## अभिनंदन

### महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील भारतीय मृद विज्ञान संस्था- शाखा राहुरी देशपातळीवरील सर्वोत्कृष्ट पुरस्काराने सन्मानित




**दि. २१ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेल्या भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा राहुरी यांना मृदविज्ञानासंबंधीच्या उल्लेखनीय कार्याबद्दल देशपातळीवरील सन २०२५ साठीचा सर्वोत्कृष्ट भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा या पुरस्काराने सलग दुसऱ्या वर्षी सन्मानित करण्यात आले. तामिळनाडू कृषि विद्यापीठ, कोइंबतूर येथे दि. १८ ते २१ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान भारतीय मृद विज्ञान संस्था, नवी दिल्ली आणि तामिळनाडू कृषि विद्यापीठ, कोइमतूर यांच्या संयुक्त विद्यमाने ८९ व्या वार्षिक संमेलन व राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये देशभरातील विविध कृषि विद्यापीठ तसेच संशोधन संस्थांचे सुमारे ३०० शास्त्रज्ञ, संशोधक सहभागी झाले होते. देशपातळीवर सध्या भारतीय मृदविज्ञान संस्थेच्या एकूण ५३ शाखा कार्यरत आहेत. या शाखांचे वर्षभरातील कार्याचे सादरीकरण तामिळनाडू येथे झालेल्या परिसंवादादरम्यान करण्यात आले. चार दिवसीय संमेलनाच्या समारोप कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृद विज्ञान विभाग येथे कार्यरत असलेल्या भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा राहुरी यांना सलग दुसऱ्या वर्षी सन २०२५ साठीचा सर्वोत्कृष्ट कार्यासाठीचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. राहुरी शाखेचे अध्यक्ष डॉ. भीमराव कांबळे, डॉ. विजय पाटील, शाखेच्या सचिव डॉ. रितू ठाकरे, शाखेचे खजिनदार डॉ. श्रीगणेश शेळके, डॉ. संजय तोडमल व डॉ. क्रांती पाटील यांनी हा पुरस्कार पश्चिम बंगाल येथील बिदनचंद्र कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. के. पात्रा यांच्या हस्ते समारोप कार्यक्रमात स्वीकारला.

मृद विज्ञान विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत असलेल्या भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा, राहुरी यांचे मार्फत सन २०२४-२५ मध्ये विद्यार्थी शेतकरी आणि संशोधक यांच्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांचे सादरीकरण कोईमतुर येथे करण्यात आले. यामध्ये आंतरराष्ट्रीय मृदा दिन, राज्यस्तरीय परिसंवाद, मृदा आणि पाणी परीक्षण प्रशिक्षण, प्रक्षेत्र भेटी इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. या कार्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली.

### राज्यस्तरीय इंद्रधनुष्य २०२५ स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मूकअभिनयामध्ये द्वितीय क्रमांक

**दि. ११ नोव्हेंबर, २०२५.** राजभवनाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य युवक महोत्सव इंद्रधनुष्य-२०२५ या स्पर्धा दि. ५ ते ९ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीमध्ये जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघाला नाट्य विभागातील मूक अभिनय या कलाप्रकारात द्वितीय क्रमांकाचे




पारितोषिक मिळाले. सदरचा पुरस्कार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व आवाजाचे जादूगार आदर्श शिंदे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

या स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ४७ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. या स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघाने मिळविलेल्या या यशाबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व संघासाठी परिश्रम घेतलेल्या विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी, संघ व्यवस्थापक डॉ. सचिन डिंगरे, सांस्कृतिक समन्वयक तथा प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ, संघ व्यवस्थापिका डॉ. क्रांती पाटील व चांगदेव दातीर यांचे अभिनंदन केले आहे. इंद्रधनुष्य या स्पर्धा युवा विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यातून कलाकार घडविण्यासाठी राजभवनाद्वारे दरवर्षी विविध विद्यापीठांमध्ये आयोजित करण्यात येतात. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील एकूण २६ कृषि व अकृषि विद्यापीठांचे एकूण १४०० विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यामध्ये एकूण २८ विविध कलाविष्कारांवर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

## राहुरी कृषि विद्यापीठात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन



**दि. २८ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे मुख्य प्रवेशद्वारा समोरील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास त्यांच्या १३५ व्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादन करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव श्री. व्ही. टी. पाटील म्हणाले की महात्मा फुले यांनी केलेले कार्य खूप मोठे असून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील पहिला पोवाडा लिहिला. पुण्यामध्ये भिडे वाड्यात महिलांसाठी पहिली शाळा सुरू केली. अशा प्रकारे महिलांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून सर्वांना दिशादर्शक ठरेल असे काम केले. सहाय्यक कुलसचिव (का.व्य.) व विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी श्री. महेश घाडगे यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी तसेच सुरक्षा विभागातील लिपिक श्री. रविराज काळे, सुरक्षा पर्यवेक्षक डी. एन. जाधव, श्री.दत्तू अडसुरे, श्री.राहुल पवार, श्री.कल्याण मेटे, श्री. तुषार गिरगुणे, वाहनचालक श्री. विष्णू गायकवाड, मिस्तरी श्री. औटी, सुरक्षारक्षक श्री. विश्वास बोर्डे, श्री. अक्षय परदेशी, श्री. अनिल नजन व श्री. रमेश थोरात उपस्थित होते.

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे वंदे मातरम गीताचा उपक्रम संपन्न



**दि. ७ नोव्हेंबर २०२५.** विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे वंदे मातरम गीतांच्या १५० व्या वर्धापनानिमीत्त १५० वा वंदे मातरम समूह गायन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनिल कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी वंदे मातरम समूह वाचन गायन केले. कार्यक्रमात डॉ. सुनिल कराड यांनी वंदे मातरम समूह गायन दिनाचे महत्व उपस्थितांना समजावून सांगितले. सर्वांनी राष्ट्रभक्तीला प्रथम प्राध्यान देण्याचे आवाहन डॉ कराड यांनी केले. याप्रसंगी डॉ. सुहास, डॉ योगेश बन, डॉ. भीमराव कांबळे, डॉ. वाळे, श्री. अनिकेत बोरचाटे, श्री. सागर शेळके, श्री. राजू गायनगडे, श्री. एस.एम. कांबळे उपस्थित होते. कार्यक्रम आयोजनासाठी भरत पाटील यांनी परिश्रम घेतले. आभार डॉ. प्रवीण गजभीये यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे वंदे मातरम गीताच्या सामूहिक गायनाचा भव्य उपक्रम संपन्न



**दि. ०७ नोव्हेंबर, २०२५.** वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत सामूहिक गायनाचा भव्य उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रेरणा भोसले यांनी भूषविले. प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कुमारी प्राची शिंदे हीने आपल्या मनोगतातून वंदे मातरम गीताची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राष्ट्रीय आंदोलनातील योगदान, तसेच देशभक्ती जागविण्यातील महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना जपावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार यांनी केले. समूहगायनाद्वारे वंदे मातरम गीताचे स्वर परिसरात गुंजल्याने

वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता व देशभक्तीची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कुमारी प्रिती कवळे हीने केले, तर आभार प्रा. पोपट पवार यांनी मानले. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहभागातून कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी



**दि. १४ नोव्हेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू यांची १३६ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या महान कार्यांची ओळख विद्यार्थ्यांना पटवून दिली. पंडित नेहरुनी स्थिर आणि मजबूत लोकशाहीचा पाया रचला, मोठ्या धरणांची निर्मिती करून कृषि समृद्धीसाठी प्रयत्न केले. खखढि, खखची आणि अखखचड सारख्या संस्थांची स्थापना केली. भारताचे सर्वात जास्त काळ कार्य करणारे पंतप्रधान म्हणून पंडीत जवाहरलाल नेहरूंची ओळख त्यांनी मनोगतातून स्पष्ट केली. स्वयंसेवक कुमार अभिमन्यु ढुस, कुमार आदित्य पोकळे, कुमारी श्वेता पाटील यांनी नेहरूंचा लहान मुलांप्रती असलेला जिव्हाळा, त्यांचा जीवनप्रवास, समाजकार्य त्याचबरोबर देशासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रेरणा भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**दि. १५ नोव्हेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. सहाय्यक प्राध्यापक कृषि कीटकशास्त्र डॉ. धनेश्वर पाटील यांनी आदिवासी समाजात धरती आबा (भगवान) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवान बिरसा मुंडांची ओळख विद्यार्थ्यांना पटवून दिली. आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी बिरसा मुंडा यांनी जीवन अर्पण केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कुमार अभिमन्यु ढुस यांनी बिरसा मुंडा यांचा जीवनप्रवास, समाजकार्यची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे इंदिरा गांधी यांची जयंती साजरी

**दि. १९ नोव्हेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भारताच्या पहिल्या महिला माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची १०८ वी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी प्रतिनिधी कुमारी तेजस्विनी गळवे व कुमारी मृणालिनी सरोटे यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या देशाच्या विकासातील योगदानावर प्रकाश टाकला. 'आयर्न लेडी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात घेतलेले धाडसी निर्णय, विशेषतः हरित क्रांती आणि बँकांचे राष्ट्रीयीकरण यांसारख्या महत्त्वाच्या योजनांमुळे



देशाच्या प्रगतीला कशी दिशा मिळाली यावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कुमार अभिमन्यु ढुस याने केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेची स्थापना





**दि. २० नोव्हेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील नूतन विद्यार्थी परिषद स्थापना समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रेरणा भोसले, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, नोडल अधिकारी प्लेसमेंट सेल डॉ. मनोज गुड उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की विद्यार्थी परिषद ही एक विद्यार्थी संघटना असून हे व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि महाविद्यालयाच्या कारभारात सहभागी होऊन सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठी मदत करते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना, आवडीनिवडी व समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी हे एक प्रभावी माध्यम आहे. यामार्फत विद्यार्थ्यांना विविध क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन, लोकशाही पद्धतीने नेतृत्व आणि व्यवस्थापनाचा अनुभव, सामाजिक जबाबदारीची जाणीव, सकारात्मक आणि सहकारी वातावरण वाढीस लागण्याचे महत्वाचे कार्य घडवून आणता येते. डॉ. सोनवणे यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेचे सभापती तसेच विविध समित्यांचे निमंत्रक व सभासदांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर विद्यार्थी परिषदेच्या प्रतिनिधींची निवड ही लोकशाही पद्धतीने व गुणवत्तेच्या आधारे करण्यात आली. तृतीय वर्षातील विद्यार्थी भुषण बाळासाहेब बाबर याची संगनमताने विद्यार्थी परिषदेच्या सभापतीपदी निवड करण्यात आली. तसेच विद्यार्थी परिषदेच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध समित्यांच्या निमंत्रक व सभासदांची निवड निरपेक्षपणे करण्यात आली. यानंतर नूतन विद्यार्थी

परिषदेतील प्रतिनिधि विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि महाविद्यालयाच्या कारभारात सहभागी होऊन सकारात्मक कार्य करण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांनी दिले. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सक्रीय सहभागातून नूतन विद्यार्थी परिषदेचा स्थापना समारंभ उत्साहात संपन्न झाला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे संविधान दिन साजरा





**दि. २६ नोव्हेंबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्टीय सेवा योजना कार्यक्रमांतर्गत संविधान दिनानिमित्त हमारा संविधान-हमारा स्वाभिमान या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांच्या सहभागातून संविधान उद्देशिकेच्या समूह वाचनाद्वारे शपथ घेऊन संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी भूषविले. भारत सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी केली जात असताना २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात साजरा केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या अलौकिक कार्याच्या सन्मानार्थ भारतात संविधान दिन साजरा केला जातो. कार्यक्रमाचे दरम्यान कुमारी प्रणाली अडसुळ या विद्यार्थिनीने संविधान दिनाची पार्श्वभूमी, त्याचे राष्ट्रीय महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना जपणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, त्याची सर्वांनी जपणूक करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाची रूपरेषा व नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कुमारी प्रिती कवळे हिने केले, तर आभार डॉ. संदीप मोरे यांनी मानले. सदर कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत आणि भारत माता की जय या घोषणांनी करण्यात आली.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी आर्या पवार गुणवंत कृषि विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित




**दि. १७ नोव्हेंबर, २०२५.** कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाच्या कुमारी आर्या अजय पवार या विद्यार्थीनीला

कृषिथॉन २०२५ गुणवंत कृषि विद्यार्थी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. युवकांचा शेतीतील सहभाग या विषयाला अनुसरून ह्युमन सर्विस फाउंडेशन व मीडिया एक्झिक्युटर्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिथॉन या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात सदरच्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील तीसहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक उत्कृष्ट कामगिरी सोबतच विविध एनएसएस कॅम्पमध्ये सक्रिय सहभाग, सामाजिक उपक्रमांमधील कार्य, ग्रामविकास व विद्यार्थी नेतृत्व क्षमता या गुणांची दखल परीक्षक मंडळाने घेतली. याबाबत महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. भारत कोलगणे, वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. मनीषा मोटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## मेजर जनरल त्यागी यांची राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयास भेट



**दि. २७ नोव्हेंबर, २०२५.** महाराष्ट्र एनसीसीचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयास भेट दिली. या भेटीदरम्यान ग्रुप कमांडर ब्रिगेडियर आर. के. पैठणकर, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. भारत कोलगणे, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी डॉ. संदीप पाटील, सहाय्यक कुलसचिव श्री. उत्तम गाताडे व सहाय्यक नियंत्रक श्री. नागेश एल्गुलवार उपस्थित होते. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर जनरल विवेक त्यागी म्हणाले की राष्ट्र निर्माण आणि युवा विकासात एनसीसीचे योगदान असून देशातील विद्यार्थ्यांना बालवयापासूनच शिस्त आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी एनसीसीचे प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने शालेय स्तरापासूनच एनसीसीचे शिक्षण देण्याची भूमिका स्वीकारली आहे व त्यासाठी एनसीसीच्या विस्तारीकरणासाठी सहमती दिली आहे. या विस्तारीकरणात प्रामुख्याने विद्यार्थिनी युवतींना संधी देण्याचा मानस असून संरक्षण दलातील संधीबरोबरच अलीकडील काळात कार्पोरेट क्षेत्रातून एनसीसी प्रशिक्षित विद्यार्थ्यांना त्यातही विद्यार्थिनींना मोठी मागणी असून त्यांना या क्षेत्रात करिअरच्या उज्वल संधी आहेत. यावेळी त्यांनी सध्या सुरु असलेल्या कॅम्पच्या रहिवासी विभागास भेट देत तेथील सोयी सुविधांची पाहणी केली. यावेळी डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी अतिरिक्त महासंघ महासंचालकांची महाविद्यालयास झालेली भेट हा महाविद्यालयासाठी सुवर्णक्षण असून एनसीसी विस्तारीकरणात कृषि महाविद्यालयास वाढीव छात्र संख्या मिळाल्याने प्रशासकीय सनदी सेवांसोबतच संरक्षण दलातील संधीही उपलब्ध होतील असे सांगितले. या भेटीदरम्यान एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरला महाविद्यालयाकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल मेजर जनरल विवेक त्यागी आणि ग्रुप कमांडर ब्रिगेडियर आर. के. पैठणकर यांनी डॉ. शैलेंद्र कांबळे यांना स्मृतिचिन्ह देऊन सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी एनसीसीचे वरिष्ठ अधिकारी तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र उपस्थित होते.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय दुग्ध दिन व भारतीय संविधान दिन संपन्न

**दि. २७ नोव्हेंबर, २०२५.** कोल्हापुर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात भारतीय श्वेतक्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने राष्ट्रीय दुग्ध दिनाच्या निमित्ताने तसेच भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इंडियन डेअरी असोसिएशनचे संचालक डॉ. चेतन नरके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे होते. यावेळी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. भारत कोलगणे,

वर्ष :५, अंक क्र. : ५९, नोव्हेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत भालेराव उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. शैलेंद्र कांबळे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की महाविद्यालयामध्ये अनुभवावर आधारीत शिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पशुपालन व दुध प्रक्रियेविषयी अद्ययावत तंत्राचे प्रशिक्षण दिले जात असून याचा फायदा घेत जवळ जवळ ४० विद्यार्थ्यांनी आपले शास्त्रोक्त गोठे आणि दुग्ध प्रक्रिया उद्योग उभारले आहेत.

यावेळी डॉ. चेतन नरके विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की सत्तरच्या दशकात सुरू झालेली आणि दुग्ध उत्पादन वाढीसाठी जगातील सर्वाधिक मोठा सुनियोजित प्रकल्प मानला गेलेल्या भारतीय स्वेत क्रांतीमुळे ९० च्या दशकात भारत दुग्धोपादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. या श्वेतक्रांतीच्या पहिल्या टप्प्यात अधिक दूध उत्पादनासाठी म्हणून दुग्ध जनावरांच्या संकरीकरणावर भर देण्यात आला होता मात्र भारताने आता श्वेतक्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला असून यामध्ये सहकारी संस्थांना बळ आधुनिक तंत्रज्ञान निर्मिती व निर्यात यासोबतच शास्त्रोक्त पशु संगोपन व संवर्धन यावर भर देण्यात येत आहे. अशा परिस्थितीत प्रशिक्षित कृषि पदवीधरांना आपल्या ज्ञान व अनुभवाच्या जोरावर स्वयम उद्योजकतेच्या मोठ्या संधी उपलब्ध असून कृषि पदवीधारांनी या संधीचा पुरेपूर वापर करून घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी डॉ. चेतन नरके यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उभारलेल्या दुग्ध प्रक्रिया प्रदर्शनास भेट देत तेथे सादर केलेल्या प्रक्रिया युक्त पदार्थांचा आस्वाद घेतला आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी संविधान दिनाच्या अनुषंगाने सर्व उपस्थित त्यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करत शपथ घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर पतंगे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. महेंद्र यादव यांनी केले. याप्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख प्राध्यापक अधिकारी कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेंडा पार्क, कोल्हापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रात महात्मा फुले पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न






**दि. २८ नोव्हेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कोल्हापुर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रामध्ये महाराष्ट्राचे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची १३५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सकाळ वृत्त

समूहाचे वरिष्ठ पत्रकार श्री. प्रकाश पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड होते. यावेळी डॉ. सुहास भिंगारदिवे, डॉ. संजय कांबळे, कार्यालय अधीक्षक श्री. सुहास साळुंखे, तांत्रिक अधिकारी डॉ. प्रवीण गजभिये उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुनील कराड मार्गदर्शन करताना म्हणाले की महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार सध्याच्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरतील असे आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठास महात्मा फुले नाव दिल्याने सार्थक झाले असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा ज्योतिबा फुले यांचे कृषिविषयक विचार हे त्यांची त्याकाळी असलेली दूरदृष्टी विशद करते. त्यांची साहित्य संपदा खूप मोठी होती. गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी साहित्य त्यांचे अनमोल विचार दर्शवतात. त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून अनिष्ट पद्धती विरुद्ध स्पष्टपणे विचार मांडले. याप्रसंगी श्री. प्रकाश पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांची ग्रंथसंपदा विश्वाला मार्गदर्शक असून महिलांसाठी शिक्षणाची सुरुवात तसेच समाज सुधारण्याचे धडे देऊन समाज सुधारण्याचे बीज महात्मा फुले यांनी रोवले असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास भिंगारदिवे यांनी तर आभार श्री. सुहास साळुंखे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब कांबळे, डॉ. मयूर सुतार, श्री. सागर शेळके, श्री. भरत पाटील, श्री. शुभम डोंगळे, श्री. समीर वाघमारे, श्री. सुरेश माने, श्री. अण्णा गाढवे व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना युनिटच्या नाम फलकाचे उद्घाटन संपन्न



**दि. २९ नोव्हेंबर, २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात ६० महाराष्ट्र बटालियन अंतर्गत नव्याने विस्तारित राष्ट्रीय छात्र सेना युनिटच्या नाम फलकाचे उद्घाटन ले. कर्नल धनाजी देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. भारत कोलगणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर पतंगे व राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. शैलेंद्र कांबळे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की महाविद्यालयातील विद्यार्थी राज्य व केंद्रस्तरीय प्रशासकीय, पोलीस, बँकिंग तसेच कृषि सेवांमध्ये अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी करत आहेत. एनसीसीमधील प्रशिक्षणामुळे त्यांना संरक्षण दलातील संधी मिळवण्यासाठी अधिक बळ मिळेल. याप्रसंगी लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई म्हणाले की तरुणांमध्ये शिस्त, संस्कार आणि देशसेवेची भावना निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेना कार्यरत असून एकता आणि अनुशासन हे ब्रीद कोणत्याही क्षेत्रात भरारी घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यावेळी झालेल्या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरगाव येथील कृषि तंत्र विद्यालयात संविधान दिन साजरा

**दि. २६ नोव्हेंबर, २०२५.** बोरगाव ता. सातारा येथील कृषि तंत्र विद्यालयात भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन, जनजागृती रॅलीसह विविध कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य



एस. के. खरगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संविधानिक हक्क व अधिकार, मार्गदर्शक तत्वे यांची माहिती देण्यात आली. यावेळी कृषि तंत्र विद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे संविधान ७५ कार्यक्रम साजरा





**दि. १८ नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) आणि राष्ट्रीय सेवा योजना एकक, कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त संविधान ७५ कार्यक्रम महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुक्ताईनगरचे सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. मनोज महाजन तसेच अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्थेच्या महिला जिल्हा उपविभागीय संवादिनी श्रीमती स्नेहा तायडे उपस्थित होत्या. कार्यक्रमास सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. रियाज शेख, प्रा. नामदेव धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर पाटील, डॉ. आबासाहेब पराडे, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील तसेच इतर शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक डॉ. मनोज महाजन यांनी संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले मूलभूत अधिकार सविस्तरपणे स्पष्ट केले. भारताचे संविधान जगातील सर्वश्रेष्ठ व सर्वसमावेशक संविधानांपैकी एक असून त्यात सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार दिला आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारतात प्रचलित असलेल्या अनेक असमानतेचे उच्चाटन संविधानामुळे शक्य झाले असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्नेहा तायडे यांनी केले. महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख यांनी संविधानात दिलेल्या अधिकारांसोबतच दिलेली मूलभूत कर्तव्येही तितक्याच निष्ठेने पाळली पाहिजेत तेव्हाच संविधानाचे उद्दिष्ट पूर्णत्वास जाते असे आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे

आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी तर आभार डॉ. सागर बंड यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे संविधान दिन साजरा






**दि. २६ नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय कृषि महाविद्यालय, धुळे येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव ईल्हे तसेच पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, प्रा. नामदेव धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर पाटील, डॉ. ऐश्वर्या पाटील तसेच इतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी संविधानाने सर्व नागरिकांना अधिकारांसोबतच मूलभूत कर्तव्येदेखील दिलेली असून नागरिकांनी ही कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडल्यासच संविधानाचे उद्दिष्ट यशस्वीपणे साध्य होईल असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे डॉ. बबनराव ईल्हे यांनी भारतीय संविधानाची सविस्तर माहिती दिली तसेच नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नामदेव धुर्वे यांनी सादर केले. त्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. सामूहिक उद्देशिका वाचनानंतर सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी भारतीय संविधानातील मूल्ये जपण्याची, लोकशाही तत्त्वांचे पालन करण्याची आणि जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडण्याची शपथ उत्साहपूर्वक घेतली. या शपथविधीमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानातील मूलभूत मूल्यांप्रती निष्ठा अधिक दृढ झाली. संविधान दिन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी देसाई हिने तर आभार प्रदर्शन डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे मौजे सालबर्डी येथे उद्घाटन संपन्न

**दि. २६ नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने Youth for Sustainable Development with special focus on Watershed Management and Wasteland Development या संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे सालबर्डी (ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) येथे आयोजित करण्यात आले होते. या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन हरताळे येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तसेच विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाटील होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि महाविद्यालय, धुळे येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. बाबनराव ईल्हे उपस्थित होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले, विद्यार्थी कल्याण अधिकारी व उपाध्यक्ष, विद्यार्थी परिषद डॉ. गणेश देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर पाटील, डॉ. ऐश्वर्या पाटील, मौजे सालबर्डी येथील उपसरपंच श्री. प्रशांत जंगले, पोलिस पाटील सौ. रुबाली बर्हाटे, जिल्हा परिषद शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. नीलेश कोळी आणि मुख्याध्यापक श्री. गणेश गोरे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. संदीप पाटील यांनी यावर्षीच्या शिबिराच्या संकल्पनेवर आधारीत मार्गदर्शन केले. त्यांनी शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी





सामाजिक बांधिलकी जपत आपली मूल्ये आणि संस्कार जोपासावेत असे आवाहन केले. डॉ. बबनराव ईल्हे यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक उपक्रम, स्वच्छता मोहीम, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकासासाठी योगदान देण्याचे महत्त्व पटवून सांगितले. श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण व कर्तव्यभावना बळकट होते असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. राहुल देसले यांनी विद्यार्थ्यांना पशुसंवर्धन, दुग्धव्यवसायातील रोजगार संधी व उद्यमशीलतेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. गणेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना जैविक शेतीविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी देसाई यांनी तर आभार डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महात्मा ज्योतिराव फुले पुण्यतिथी साजरी



**दि. २८ नोव्हेंबर २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी सहाय्यक प्राध्यापक प्रा. नामदेव धुर्वे, यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की महात्मा फुले हे महिलांचे शिक्षण तसेच शोषित–वंचित समाजांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्यरत राहिले. ते केवळ समाजसुधारक नव्हते तर एक महान विचारवंत, लेखक आणि परिवर्तनकर्ते होते. त्यांचे गुलामगिरी हे पुस्तक आजही सामाजिक क्रांतीचा आधार मानले जाते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके आणि डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी मानले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

नोव्हेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्र. : ५१, नोव्हेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन संपन्न



**दि. ७ नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रांमुळे वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्याचा कार्यक्रम सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. याप्रसंगी उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद डॉ. विजय तरडे, कुलमंत्री विद्यार्थी वसतिगृह डॉ. अविनाश गोसावी, कुलमंत्री विद्यार्थिनी वसतिगृह डॉ. पल्लवी सूर्यवंशी व इतर अधिकारी कर्मचारी यांनी सामूहिक वंदे मातरम या गीताचे गायन केले.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धांचे आयोजन






**दि. २० नोव्हेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे अंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत एकूण १८ संघांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धांचे उद्घाटन कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजय तरडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रीतम शिंदे, शारीरिक शिक्षण विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. निलेश नलावडे व सहाय्यक कुलसचिव श्री. राजेंद्र निक्रड उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. महानंद माने म्हणाले की फुटबॉलसह सर्व क्रीडास्पर्धा या निकोप वातावरणात आणि स्पर्धात्मक भावनेने पार पडल्या पाहिजेत. खेळाच्या मैदानावर परस्परांबद्दल आदर आणि खिलाडूवृत्ती सर्वात महत्त्वाची असते. हार – जीत हा खेळाचा अविभाज्य भाग असला तरी जिंकण्यासाठीची जिद्द आणि संघभावना प्रत्येक खेळाडूमध्ये असणे आवश्यक आहे. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच सहभागी संघाचे खेळाडू उपस्थित होते.

प्रकाशक : डॉ. गोरक्ष ससाणे
संचालक, विस्तार शिक्षण

प्रमुख संपादक : डॉ. सचिन सदाफळ
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

सहसंपादक : श्री. सुनिल राजमाने
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

डिझाईनर : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८२५/२०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, नोव्हेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, नोव्हेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी